क्र.का.प्रा.वि/आयसीडी/२०२२-२३/१८४

# मुंबई विद्यापीठ

मसुदा गोपनी क्र.१२/२०२२-२३

व्यवस्थापन परिषद
दिनांक ८ सप्टेंबर, २०२२

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२२-२३ मधील ८ सप्टेंबर, २०२२ च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बारावी सभा गुरूवार, **दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी १२.३० वाजता** व्यवस्थापन परिषदेचे दालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८ येथे आयोजित करण्यात आली होती.

सभेच्या बैठकीत पुढील सभासद उपस्थित होते.

| अनु.क्र | सदस्यांची नावे | सही |
|---|---|---|
| १ | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | उपस्थिती |
| २ | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | उपस्थिती |
| ३ | श्री. दिपककुमार मुकादम | अनुपस्थिती |
| ४ | प्रा. राजेश खरात | उपस्थिती |
| ५ | डॉ. अनुराधा मजुमदार | उपस्थिती |
| ६ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | अनुपस्थिती |
| ७ | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | अनुपस्थिती |
| ८ | डॉ. शैलेंद्र देवळाणकर (प्रभारी-कुलसचिव) | उपस्थिती |
| ९ | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकरी) | उपस्थिती |
| १० | डॉ. प्रसाद करंडे (प्रभारी-संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ) | उपस्थिती |

➢ **स्वागत** :-सदस्य सचिवांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **श्रध्दांजली**

## श्री. अभिजित सेन

➢ सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे पुरस्कर्ते, ग्रामीण अर्थव्यवस्थेचे अभ्यासक आणि देशातील प्रमुख अर्थतज्ज्ञ श्री. अभिजित सेन यांचे हृदय विकाराच्या झटक्याने दिनांक २९ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ७२ वर्षाचे होते.

## ॲड. सुखदेव काशीद

➢ म्युनिसिपल मजदूर युनियन मुंबईचे अध्यक्ष ॲड. सुखदेव काशीद यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०१ सप्टेंबर २०२२ रोजी निधन झाले.

## डॉ. एस. परशुरामन

➢ टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबईचे माजी संचालक आणि एम आयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरू व थोर शिक्षणतज्ञ प्रा. डॉ. एस. परशुरामन यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षाचे होते.

## श्री. सायरस मिस्त्री

➢ टाटा सन्सचे माजी अध्यक्ष आणि प्रसिध्द उद्योगपती श्री. सायरस मिस्त्री यांचे अपघाताने दिनांक ०४ सप्टेंबर २०२२ रोजी निधन झाले. मृत्यू समयी ते ५४ वर्षाचे होते.

| अनु. क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| **बाब क्र. १** | दिनांक २४ ऑगस्ट आणि ३० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| **ठराव** | दिनांक २४ ऑगस्ट आणि ३० ऑगस्ट, २०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र. २ | विद्यापीठाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ मधील कलम ३७ (i) अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर. | म.मा. आणि वि. कक्ष |
| ठराव | वार्षिक बृहत अराराखडा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३७ (झ) व कलम १०७ (५) नुसार, शैक्षणिक वर्ष २०२३—२४ करिता मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रातील जिल्हांमध्ये नवीन महाविद्यालयाचे मागील बृहत आराखडयातील रिक्त बिंदूच्या शिफारशी नुसार दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाने केल्या. तसेच अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली असून वार्षिक बृहत आराखडा विद्यापरिषदेसमोर ठेवण्याची शिफारस केली. | |
| बाब क्र. ३ | Approval of Minutes of Building and Works Committee dated 2nd September, 2022 and to place item before Management Council. | पा. सु. नि. अं. व दे . विभाग |
| ठराव | It was resolved that Minutes of Building and Works Committee dated 2nd September, 2022 were accepted by the Management Council | |
| | **आयत्यावेळी आलेली बाब** | |
| बाब क्र. ४ | लायन्स क्लब ऑफ सिल्वासा चॅरिटेबल ट्रस्टचे श्रीमती देवकीबा मोहनसिंहजी चौव्हान कॉलेज ऑफ कॉमर्स आणि सायन्स, सिल्वासा या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून विस्तारिकरणासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार **बी.कॉम. या अभ्यासक्रमास एक अतिरिक्त तुकडी** आणि लायन्स क्लब ऑफ सिल्वासा चॅरिटेबल ट्रस्टचे हवेली इन्स्टिटयूट ऑफ लिगल स्टडिज ॲण्ड रिसर्च, सिल्वासा या महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२०-२३ पासून **एल.एल.बी.(३ वर्षिय) अतिरिक्त तुकडी** सुरू करण्याकरिता प्रस्तावरील अधिष्ठाता मंडळाचा ठराव व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ सादर. | म.मा. आणि वि. कक्ष |
| ठराव | उच्च व तंत्र शिक्षण विभागास पत्र लिहून सदर बाबी विषयी विधी व न्याय विभागाचे मत मागविण्यात यावे असे ठरले. | |
| बाब क्र. ५ | Annual Accounts for the year 2016-2017,2017-2018,2018-2019, & 2019-2020, Income & Expenditure Accounts and Balance Sheet as on 31st March 2017,31st March 2019 and 31st March 2020 and Audit Report of 2016-2017,2017-2018,2018-2019 & 2019-2020 submitted by M/s. NBS & Co. Chartered Accountant & Statutory Auditor along with remark of the Finance & Accounts | वित्त व लेखा विभाग |

| | | |
|---|---|---|
| | Committee be approval and be approved and be recommended to the Senate for their consideration and approval. | |
| ठराव | It was resolved that Annual Accounts for the year 2016-2017,2017-2019,2018-2019,&2019-2020,Income& Expenditure Accounts and Balance Sheet as on 31st March 2017,31st March 2019 and 31st March 2020 and Audit Report of 2016-2017,2017-2018,2018-2019 & 2019-2020 submitted by M/s. NBS & Co. Chartered Accountant & Statutory Auditor along with remark of the Finance & Accounts Committee be approval and be approved and be recommended to the Senate for their consideration and approval. | |
| | **चर्चेच्या अनुषंगाने आलेली बाब** | |
| बाब क्र. ६ | प्रा. संजय देशपांडे ह्यांना कलिना परिसरातील शिक्षक सदनिकेत राहण्यासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्याबाबत. | विद्यानगरी प्रशासकिय विभाग |
| ठराव | प्रा. संजय देशपांडे हे सध्या रशियन व युरेशियन अध्यासन केंद्राचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत व विद्यापीठाच्या सदनिकेत वास्तवात आहेत. सदर विषय हा तांत्रिक स्वरूपाचा असून त्यासाठी विषेश प्राविण्य असणारी व्यक्ती आवश्यक आहे. त्यामुळे श्री. देशपांडे यांना समन्वयक म्हणून ठेवण्यात आले आहे. तसेच श्री. देशपांडे यांना फुफ्फुसाच्या कर्करोगाचा दुर्धर आजार झाला असून त्यांचे स्वरूप गंभीर आहे. त्यासाठी त्यांना वैद्यकिय खर्च मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे त्यांना सदनिकेत भविष्यात राहू देण्याचे व नियमानुसार त्यांच्याकडून घरभाडे घेण्याचे तसेच त्यांना लावण्यात आलेल्या आर्थिक दंड माफ करण्यात आला. त्यांचे वैद्यकिय कारण लक्षात घेता. एक विशेष बाब म्हणून सर्वानुमते मान्य करण्यात आले. | |
| बाब क्र. ७ | मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू ह्यांच्या निवासस्थानी पुरविण्यात येणारी सेवा (कुक, ड्राईवर, ईलेक्ट्रीशियन आणि सफाई कामगार इत्यादी) आऊट सोर्सिंग करण्याची बाब. | |

| ठराव | मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू हयांच्या निवासस्थानी पुरविण्यात येणारी सेवा कुक, ड्राईवर, ईलेक्ट्रीशन आणि सफाई कामगार इत्यादी आऊट सोर्सिंग करण्याची बाब मान्य करण्यात आली. | |
|---|---|---|

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू